## प्रकरण पाचवे

# समारोप व निष्कर्ष

कुंजविहारी यांच्या 'गीतगुंजारव' व 'आहुती' या दोन काव्यसंग्रहाच्या आधारे कुंजविहारींचे जीवन, आत्मानुभव व कवीची कविता समांतर धाग्यांनी गुंफलेल्या वस्त्राप्रमाणे आहे ते पाहिले. कुंजविहारीचे जीवन, विचार, आचार, कर्म व साहित्य यांच्यामध्ये कुठेही विसंगती नाही. या सर्वांमध्ये एकसंघपणा आहे. कुंजिवहारीनी राष्ट्राचा सेवक होण्याचे ध्येय उराशी बाळगले होते. कवीचे आयुष्य कृती, उक्ती, साहित्य हे एका ध्येयाने, राष्ट्रीय भावनेने प्रेरित झाले होते. ही एकनिष्ठता कवींनी शेवटपर्यंत पाळलेली दिसते.

कुंजविहारीच्या काव्यसंग्राच्या अभ्यास केला. त्या अभ्यासातून काही निष्कर्ष घेता आले ते पुढीलप्रमाणे -

**१) विषयाचे महत्त्व व अभ्यास पध्दती -**

१९३०-३१ च्या सुमारास स्वातंत्र्य चळवळीचे लोण सोलापूरात पोहचले होते. मार्शल लॉ च्या काळात कुर्बान - ए - हुसेन, मलप्पा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे, श्रीकृष्ण सारडा हे चार हुतात्मे झाले.

या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या वातावरणात कवी कुंजविहारी यांनी राष्ट्रीय कविता लिहिल्या. युगप्रेरणेशी समांतर राहून त्यांनी काव्य लेखन केले. त्यातून सोलापूरचे ते एक महत्त्वाचे कवी होते. आधुनिक मराठी काव्यात कुंजविहारीचे स्थान ध्रुव ताऱ्याप्रमाणे आहे. स्वतःची एक खास शैली आहे की, ज्यामध्ये लखलखाट, सौम्यता, अटळता, आपल्यापरीने जगाला दिशा देण्याचे व प्रकाशमान करण्याचे सामर्थ्यतित आहे. तसेच

मराठी राष्ट्रीय काव्यामध्ये पितामह भीष्माप्रमाणे राष्ट्रप्रेमाशी एकनिष्ठ राहिले आहेत. अनुकूल प्रतिकूल काळातही ही एकनिष्ठता कवीने सोडली नाही. कुंजविहारीचे मराठी साहित्यात महत्त्वाचे स्थान आहे. राष्ट्रीय काव्यात सावरकर, गोविंद, विनायक, कुंजविहारी अशी नामावली देता येते. समकालीन कवीच्या तुलनेत कुंजविहारीचे काव्य राष्ट्रीय भावनेशी, वातावरणाशी एकनिष्ठ असलेले दिसते. अशी एकनिष्ठता इतर समकालीन रविकिरण मंडळादी (अपवाद सोडता) काव्यात दिसत नाही. कुंजविहीरींचा कालखंड राष्ट्रीय भावनेच्या विस्ताराचा कालखंड आहे.

आत्मानुभूतीतून कुंजविहीरींच्या कविता आलेल्या आहेत म्हणून त्यांचे जीवन चरित्र आणि त्याचा त्यांच्या काव्यावर झालेला परिणाम पाहणे अगत्याचे ठरते. ललित साहित्य हे ललित लेखकांच्या जीवनांचा आविष्कार असते. ते शोधावे लागते. परंतु या कवींच्या बाबतीत तसे नाही. जसे जीवन तसेच लेखन आहे. आडपडद्याने इथे तो आविष्कार शोधावा लागत नाही. आरशातल्या स्वच्छ प्रतिबिंबाप्रमाणे ते स्पष्ट दिसत आहे. म्हणूनच कुंजविहारीच्या काव्याचा अभ्यास चरित्रात्मक अभ्यास पध्दतीने केला आहे.

## II) जीवनचरित्र व व्यक्तिमत्त्व -

कुंजविहारी यांनी 'हरिहर' 'त्रिशुल' या नावाने लिखाण केले आहे. परंतु त्यांचे नाव आहे. हरिहर गुरूनाथ कुलकर्णी / सरकगर/ जन्म १०/११/१८९६ मृत्यु १/११/१९७८ कवीचे शिक्षण १० वी पर्यंत झाले. व याच्या २८ व्या वर्षापासून संसाराचे ओझे वाहिले ते शेवटपर्यंत त्यांनी अनेक नोकऱ्या केल्या. अनेक व्यवसाय केले. गिरणी कामगार असताना गिरणी कामगाराचे दुःख, दैन्य जवळून पाहता आले. कामगाराचे संप व मोर्चे कसे दडपून टाकले जात होते हे ही पाहिले. पारतंत्र्यातील जीवनही अनुभवले टिळकांचे व गांधीजीचे विचारप्रवाह आले. या सर्वांचा परिणाम असा झाला की कवीचे

ध्येय निश्चित झाले. कवींनी राष्ट्राची सेवा करण्याची खुणगाठ बांधली व त्यासाठी त्यांनी स्वतःला वाहून घेतले. वेळप्रसंगी चळवळी केल्या. कारावासही भोगला. अनेक सामाजिक सांस्कृतिक साहित्यिक कार्यामध्ये स्वतःला वाहून घेतले. यासाठी कशाचीही अपेक्षा केली नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही या तत्त्वाशी ते एकनिष्ठ राहिले. स्वराज्याचे सुराज्य व्हावे ही त्यांची इच्छा होती. यासाठी त्यांनी नवतरूणास दिशाही दिली.

या सर्वातून त्यांचे व्यक्तिमत्त्व फूलत होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलूही अनेक आहेत. राष्ट्रभक्ती हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वात मुरलेला गुण आहे. यामुळेच ते राष्ट्रीय कविता लिहू शकले. साधेपणामुळे, निःस्वार्थी, भावनेने राष्ट्राची सेवा कळू शकते तो त्यांच्या जीवनाचा मूळ पाया होता. जेवढा निस्वार्थी, साधा माणूस तेवढी त्याच्याकडे संकटाशी सामना करण्याची शक्ती येत असते. व तो इतरांना आवाहनही करू शकतो. गुणांनी युक्त माणुस ईश्वरी तत्त्वाशी एकरूप पावतो व त्याचे जीवन पारमार्थिक आध्यात्मिक बनते. यातूनच एक नवा आत्मविश्वास येतो व यामुळे होकारार्थी जीवनाचे भवितव्य दिसते. तो प्रत्यक्षात आणू शकतो. याचे नाव आशावाद आहे. आशावादाने जीवन यशस्वीतेकडे जाते आणि कुंजविहारींचा संसार सर्व हिंदूस्थानाच्या स्वातंत्र्याचा होतो. तो आशादायी भूमिक्नेने लोकांनी ऊजळवला व देशाला स्वातंत्र्य मिळाले. अशा पध्दतीने कुंजविहारीचे जीवन व व्यक्तिमत्त्व एकाच नाण्याच्या बाजू असल्याचे दिसून येते.

## III) मराठीतीत राष्ट्रीय कविता आणि कुंजविहारी -

स्वातंत्र्य संग्रामात स्वतःला झोकून देणारे राष्ट्र शाहीर कुंजविहारी यांच्या काव्याचा अभ्यास करत असता राष्ट्रीय काव्याचे स्वरूप उगम, विकास व्याप्ती व कुंजविहारीचे राष्ट्रीय काव्यात असणारे स्थान स्पष्ट करणे क्रमप्राप्त ठरते.

राष्ट्र व राष्ट्रवाद या संकल्पनांचा उदय १८ व्या शतकात झाला व तिचा विकास

आजतागायत होत आहे. राष्ट्रीय कवी व कविता याचे निकष राष्ट्रीयत्व आहे. राष्ट्रीय काव्याचा उगम इंग्रजी काव्यातून झाला नाही. तर तो राष्ट्रप्रेमातून झाला. याला पुरावा म्हणजे प्राचीन लोकांच्या काव्यातून आढळणारी देशभक्तीची भावना. मराठी साहित्यातूनही ही भावना व्यक्त झालेली दिसते. संताच्या राष्ट्रीय कार्याने शिवाजी हा राष्ट्रनेता दिला. हे संताचे कार्य ते पुढे पंडीती कवीनीही बजावले. यानंतर आलेल्या शाहिरी काव्यानेही सैन्यात व लोकांच्यात राष्ट्रीय भावना जागृत ठेवली. म्हणूनच अटकेपर्यंत झेंडा मराठ्यांना फडकाविता आला. मराठी राष्ट्रीय कवितेची प्रेरणा ही स्वयंप्रेरित आहे. जरी इंग्रजी शिक्षणाने प्रेरणा, नवी दिशा दिली. तरीही तिची व्याप्ती पाहिली तर मराठी राष्ट्रीय कविता अनेक प्रकारांनी बहरलेली दिसते. ते तिचे अंगचे स्वयंभू स्वभाव आहेत. मराठी साहित्य व काव्यावर राष्ट्रीय चळवळीवर विचारवंताचा परिणाम झाला आहे. मराठी राष्ट्रीय कवितेच्या विकास कालखंडानुसार ५ टप्प्यात पडलेले दिसून येतात.

१) आधुनिक मराठीतील राष्ट्रीय कवितेचा पहिला कालखंड (इ.स.१८५० ते इ.स.१८७४) या कालखंडात नियकतकालिकांनी राष्ट्रीय कार्य बजावले उदा. ‘विविध ज्ञानविस्तार’ तसेच ‘दक्षिणाप्राईज कमिटी’ या संस्थेनेही हे कार्य केले.

२) राष्ट्रीय जागृतीचा कालखंड (इ.स.१८७४ ते इ.स.१९०५) या कालखंडात केशवसुत, चंद्रशेखर, माधवानुज, विनायक आदी कवींनी राष्ट्रीय कविता लिहिल्या.

३) राष्ट्रीय क्षोभाच्या परिस्फोटाचा आणि क्रांतिपरतेचा कालखंड अर्थात राष्ट्रीय कवितेचे सुवर्णयुग (इ.स.१९०५ ते इ.स.१९२२) या कालखंडात गोविंद, सावरकर, द्र.आ.तिवारी, माधव आदी कवींचा उल्लेख करता येईल.

४) राष्ट्रीय भावनांच्या विस्ताराचा आणि गांधीजींच्या नेतृत्वाने प्रभावित झालेला

खंड (इ.स.१९२२ ते इ.स.१९३५) या कालखंडात बापट, सानेगुरूजी, कुंजविहारी, आदी कवींनी राष्ट्रीय कविता लिहिल्या.

५) मानवतावादी राष्ट्रवाद, समाजवाद, साम्यवाद आणि व्यक्तिवाद या संमिश्र वैचारिक प्रभावातून काव्यनिर्मिती करणारा कालखंड अथवा राष्ट्रीय कवितेच्या ओहोटीचा कालखंड (इ.स.१९३५ ते इ.स.१९५०) या कालखंडात कुसुमाग्रज, मनमोहन, संत तुकडोजी, बापट आदी कवींच्या कवितांनी भर घातली.

हे भाग पाहिल्यानंतर मराठी काव्यातील राष्ट्रीय कविता व इतर भाषांतील राष्ट्रीय कवितेचे साम्यविरोध पडताळणे क्रमप्राप्त आहे.

कुंजविहीरीचे वेगळेपण व महत्व ही या अनुषंगाने पडताळणे योग्य आहे. वरील विवचेनावरून राष्ट्रीय काव्याविषयीची संकल्पना स्पष्ट होते व कुंजविहारीचे स्थानही स्पष्ट होते.

**प्रकरण तिसरे -**

**कुंजविहारींच्या कवितेचे अंतरंग -**

कुंजविहारीच्या 'गीतगुंजारव' 'आहुती' या काव्यसंग्रहातील एकूण ११७ कविता आहेत. यामध्ये ३४ समानधर्मी कविता आहेत. त्यामुळे एकूण ८३ कवितेचे अंतरंग आपण पाहिले. ते पुढीलप्रमाणे,

या काव्यसंग्रहाच्या अंतरंगात प्रवेश केल्यानंतर ठळक ४ टप्पे आपल्याला दिसतात. १) राष्ट्रीय कविता २) वाङ्‌मय विषयक कविता. ३) आध्यात्मिक कविता ४) अनुवादित कविता पहिल्या राष्ट्रीय विभागात अनेक राष्ट्रीयत्वाच्या छटा दिसतात. राष्ट्रभक्ती हा या कवितेचा मूळस्त्रोत आहे. पारतंत्र्यात भारत देश असल्याने त्या भावनेमुळे पारतंत्र्याविषयी चीड दिसून येते. व मातृभूमीबद्दल प्रेमही दिसून येते. भारत स्वतंत्र व्हावा म्हणून आत्माहूती देणारे तरूण निर्माण व्हावे म्हणून त्या पध्दतीच्या

आत्माहूतीच्या कविता लिहल्या. तर कवीच्या क्रांतीच्या जयजयकार करणाऱ्या कविताही ठसा उमटवून गेल्या. पूर्व परंपरेचा अभिमान सांगितल्याने लोकांना ते वैभव मिळविण्याची जाग आणून दिली. हे वैभव मिळविणाऱ्या थोर विभूतीची आठवण लोकांना कवीने करून दिली. कुजविहारी अनेक कवितेतून स्वातंत्र्य देवीचे स्तवनही आळवीत आहेत. तसेच शृंगारिक काव्यातून निडर वीरांगणा चित्रित केली आहे.

कुंजविहीरीच्या वाङ्‌मयविषयक कवितेतून कवी, काव्य, कविकल्पना याविषयीचा महिमा गायला आहे. तर आध्यात्मिक काव्यातून कवीनी एक आध्यात्मिक उच्च पातळी गाठली व लोकांना निःस्वार्थी कार्यात समर्पित होण्यास प्रवृत्त केले. आध्यात्मिक काव्याचा स्पर्श झाल्याने त्यांच्या काव्याला सात्विकपणाची झालर आली आहे. त्यामुळे त्यांच्या काव्याच्या सात्विक भावना लोकांच्या पर्यंत पोहचल्या आहे.

कुंजविहारीच्या अनुवादित काव्यातून राष्ट्रीय, आध्यात्मिक भावना आली आहे. अनुवादित कविता या सुध्दा स्वतःची वेगळी शैली घेऊन अवतरली आहे.

अशा पध्दतीने काव्याचे अंतरंग थोडक्यात उलगडून पाहता येईल.

**प्रकरण - ४ थे**

**कुंजविहारींच्या कवितेतील सौंदर्य -**

कुंजविहारीच्या काव्यातील भावनासौंदर्य टप्प्यात पाहता येईल. कुंजविहारीची भाषा सरळ साधी आहे. परंतु तिच्यातला भाव वाचकांच्या, श्रोत्यांच्या हृदयाचा ठाव घेणारा आहे. त्या काव्याच्या यशस्वीतेचे गमक त्यांच्या काव्यात असणारे भावसौंदर्य आहे. ती सौंदर्य कोणती पुढीलप्रमाणे -

कुंजविहारीच्या काव्यातील मुख्यभाव म्हणजे स्वातंत्र्यप्रेम. ही भावना सर्व काव्यात दिसून येते. 'स्वातंत्र्य मिळविणे' ही भावना कवीच्या नसानसात भिनलेली आहे. या भावनेतही ४ टप्पे पडलेले दिसतात. १) देशाला पारतंत्र्यातून मुक्त करणे २) स्वातंत्र

प्राप्तीचा आनंद ३) स्वराज्याला सुराज्य बनविण्यासाठीचा संदेश ४) सुराज्य बनविण्यासाठी काही तत्वाचा अवलबं केला पाहिजे. हे आग्रहाने सांगितले. स्वातंत्र्य प्रेमापोटीच त्यांच्या मनात पारतंत्र्याची चीड उत्पन्न झाली. ती काव्यातून अनेक ठिकाणातून दिसून येते ती चीड लोकांनाही जागृत करते. राष्ट्रभक्तीची काव्यातून दिसून येणारी भावना तरूणांना राष्ट्रीयत्वाचे धडे शिकविते. तसेच काव्यात दिसणारी आशावादी भावना मानवाला निराशेचा पैलतीर पार करण्यास मदत करते. इथेही काव्यात कवीने आशा निराशेचा किरण दाखवत स्वातंत्र्य नौका क्रांतीचा जयजयकार करत पार केली आहे. यासाठी वीररसाचाही वेळोवेळी आविष्कार केला आहे. सामाजिक सद्यस्थितीला वाचा फोडण्यासाठी करूण रसही काव्यात आला आहे. मातृभूमी या शब्दातच मातापुत्र नाते दिसते. या अर्थाच्या अनुषंगाने इतर मातापुत्राचे नाते व्यक्त करताना वत्सल रसही अवतरतो आहे.

काव्यात आध्यात्म आल्याने भक्ती रसाचाही अविष्कार काव्यातून झालेला दिसून येतो. काव्यात कल्पनासौंदर्य अवतरले आहे. ते वेगवेगळया साधनाच्या माध्यमातून निसर्गाच्या माध्यामातून कल्पना करून राष्ट्रीय कवितेचे कल्पना सौंदर्य खुलविले आहे. काही ठिकाणी पौराणिक कथांचा आधार घेऊन सद्यस्थितीच्या, आविष्काराने दोन्हीच्या समन्वयातून सुंदर कल्पनासौंदर्य साकारले आहे. काही रूपक घेऊन कल्पना सौंदर्य फुलविण्याचा प्रयत्न केला आहे. पूर्व सरकाराच्या ज्या काही कल्पना आहेत त्याचा उपयोग करून उदा. पूनर्जन्म. त्याच्या माध्यमातून कल्पनासौंदर्य काव्यात साकार केले आहे.

भाषासौंदर्य पाहत असता कवीची भाषा लोकांच्या, वाचकांच्या मनापर्यंत जावून पोहचते ती तिच्यातील सहज,साध्या,सोप्या, भोषेमुळे. जसा कवितेचा भाव आहे तशी कवितेची भाषा आहे. म्हणजेच भावानुरूप भाषा आहे.

राष्ट्रीय काव्य असल्याने काव्यातून आवाहन व संबोधने आली आहेत. कवीच्या भाषेतून संस्कृत व उर्दू भाषेचा वापर झालेला आहे. तो त्यांच्या काव्यातून पहावयास मिळतो. संस्कृत सुभाषितांचा काव्यात वापर झालेला दिसतो.

**समारोप -**

कवी कुंजविहारी यांचे स्थान मराठी साहित्यामध्ये वरचे आहे. कोणताही साहित्यिक समाजाचे प्रतिबिंब त्याच्या साहित्यात अवतरत असतो. देशात एवढी मोठी स्वातंत्र्यासाठीची उलथापालथ झाली होती. आणि कवींच्या समकालीन असणारे कवी, रविकिरण मंडळ हे समाजातील इतर सुख दुःखाना कुरवाळीत बसले होते. त्यांनी राष्ट्रीय भावनेला दुय्यम नव्हे तर नगन्य स्थान दिले होते. परंतु परिस्थितीला सामोरे जावून आवाहन स्वीकारणारे फक्त काही थोडे साने गुरूजीसारखे त्या कालावधीमध्ये कवी सोडले तर कवी कुंजविहारीशिवाय अन्य कुणीही या कालखंडात दिसत नाही. म्हणून कुंजविहारीचे व त्यांच्या कवितेचे स्थान वरच्या दर्जाच्या आहे यात शंका नाही.

सर्व काव्य आत्मानुभूतीतून व्यक्त झाले आहे. त्यामुळे त्याला आत्मनिष्ठ व एकनिष्ठतेचा स्पर्श झाला आहे. तुकाराम, नामदेव, सावरकर यांच्या प्रमाणे कुंजविहारीचे काव्य आत्मनिष्ठ आहे. म्हणूनच कुंजविहारींचे काव्य श्रेष्ठ आहे.

कुंजविहारीच्या व्यापक राष्ट्रवादाच्या भूमिकेमुळे आधुनिक कवितेचे एक नवोदित टिकाकार प्रा.नि.शं.ठकार म्हणतात - ‘‘राष्ट्रभक्तीकडुन कवीची वृत्ती आत्मशक्तीकडे, अध्यात्माकडे वळते आहे.... कुंजविहारीचे अध्यात्मही समाजवादी व पुरोगामी आहे.’’ समकालीन राष्ट्रीय आंदोलनाचे पडसाद ज्या एका मराठी शाहिराच्या काव्यात उमटलेले आहेत ते म्हणजे कुंजविहारी.’’ १

**राष्ट्रीय काव्यातील कुंजविहारीचे स्थान -**

राष्ट्रीय काव्यात प्रत्यक्ष भाग घेऊन त्या अनुभूतीतून कविता लिहणाऱ्या बोटावर

मोजण्यासारख्या कवीला कुंजविहारींच्या कवितेचा स्थायीभाव महाकवी सावरकर आणि स्वातंत्र्यशाहीर कवी गोविंदाप्रमाणेच त्यांनी राष्ट्रभक्तीपर गीते लिहीली आहेत.

आहुतीचे संपादक श्री.ज.शा.देशपांडे समालोचन करतना म्हणतात - ''कुंजविहारी यांचीही राष्ट्रीय कविता राष्ट्रीय कविता आहे. ती सत्प्रवृत्तीची सात्विक रसाची प्रसादपूर्ण मंदाकिनी आहे. कुंजविहारी हे खरेखुरे सामान्यजनाचे कवी होत.''[२] वि.म.कुलकर्णी म्हणतात - कविवर्य कुंजविहारी यांची जीवनयात्रा सुखदुःखाच्या संमिश्र धाग्यांनी गुंफलेली होती. तरी तिच्यावर उज्ज्वल स्वातंत्र्यभक्तीची व राष्ट्रप्रेमाची जरतार सदैव शोभत होती. ते एक धगधगते अग्निकुंड होते.'' [३]

राष्ट्रीय भक्तीने, भारलेल्या मनाने केलेली रसनिर्मिती असेच त्यांच्या काव्याचे स्वरूप आहे. महाकवी सावरकर, स्वातंत्र्यकवी गोविंद, कवी माधव, अज्ञातवासी या कवीच्या काव्यातील ओजोगुण त्यांच्या काव्यात नसेलही. पण त्यांचे जीवन तर ओजोगुणाने संपन्न आहे. म्हणून गिरणी कामगारासारखे दैन्य उपभोगूनही निराश न होता त्यांनी राष्ट्रीय आशावादाची गाणी गायली. आपली वैयक्तिक दुःखे, आर्थिक दैन्य यांना त्यांनी हृदयात कोंडून ठेवून स्वदेशाभिमानाची गाणी गायली. म्हणूनच 'स्वातंत्र्य संग्रामात स्वतःला झोकून देणारे राजे शाहीर' या शब्दानीच त्यांचा गौरव केला पाहिजे.

मराठी राष्ट्रीय कवितेमध्ये कवी कुंजविहारी यांच्या कवितेचे एक स्वतंत्र स्थान आहे. त्यांची कविता ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा जसा आविष्कार आहे. तसाच तत्कालीन राष्ट्र भावनेचाही आविष्कार आहे. युगप्रेरणेशी समांतर राहून पारतंत्र्याबद्दल चीड, स्वातंत्र्याबद्दल प्रेम, स्वातंत्र्यासाठी आत्मसमर्पण, पारतंत्र्यामुळे निर्माण होणारे दुःख, स्वातंत्र्यानंतर स्वराज्याचे सुराज्य करण्याची मनिषा आणि भक्तीपर भावना या गोष्टीला त्यांच्या कवितेत महत्त्वाचे स्थान मिळाले आहे. राष्ट्रभक्ती हाच त्यांच्या कवितेचा प्रमुख विशेष आहे. ती प्रेरणादायी ओजस्वी अशी कविता आहे. कवी कुंजविहारीच्या

कवितेची अभिव्यक्तीही तितकी वैशिष्ट्यपूर्ण आहे. आशयानुरूप भावसौंदर्य काव्यात्मकता, वीर, करूण, भक्ती, शांत या रसांचा आविष्कार, साधी, सोपी शब्दकळा चित्रमय वर्णन शैली, प्रतिमा, प्रतीके आणि पारदर्शी भावाविष्कार ही त्यांची कवितेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. म्हणूनच एकूण मराठी कवितेमध्ये कवी कुंजविहारीचे स्थान वरच्या दर्जाचे आहे.

**संदर्भ -**


१) नि.शं.ठकार 'मराठी कविता स्वरूप आणि विवेचन' पृ.२९८

२) 'आहुती' कवितासंग्रह प्रस्तावना.

३) वि.म.कुलकर्णी, लेख, राष्ट्रभक्तीने भारलेला थोर कवी कुंजविहारी, तरूण भारत, पुणे, अंक १२-११-११७८